दि.२९/०६/२०२६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, दि.२९/०६/२०२६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १०  प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा**
**अनुमोदक :- श्री.विष्णु रामदास भंगाळे**

**सही /-**
**(डॉ.चंद्रशेखर शिवाजी पाटील)**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त,महानगरपालिका, जळगांव.**

अतिक्रमण निर्मुलन विभागाकडेस आवश्यकते प्रमाणे कामगारांचा पुरवठा करणेकामी (आवश्यकते प्रमाणे यात वाढ,घट होवु शकते) येणाऱ्या रक्कम रु.१,३३,२०,०००/- मात्रचे खर्चास व सन २०२६-२७ करीता ई निविदा प्रसिध्द करणेस तसेच ई निविदा प्रक्रिया पुर्ण होई पावेतो मक्तेदार रॅपिड सिक्युरिटी ॲण्ड सर्व्हीसेस,जळगांव यांना ३५ मजुर पुरवठा करणेस मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, अतिक्रमण निर्मुलन विभागाकडेस आवश्यकतेनुसार मजुरांचा पुरवठा करणे कामी स्थायी समिती ( प्रशासक ठराव क्रं. २५५ दिनांक-३०/०४/२०२५ अन्वये एकूण ३५ मजूर घेणेसाठी मान्यता मिळालेती असुन अतिक्रमण निर्मूलन विभागास २५ मजुरांची आवश्यकता असल्याने रॅपिड सिक्युरिटी ॲण्ड सर्व्हसेस,जळगाव यांना जा.क्र/अति.नि.वि./०७/२०२५-२६ दिनांक २१/०५/२०२५ अन्वये दिनांक ०१/०६/२०२५ पासून २५ मजुर पुरविण्यासाठी ११ महीन्याकरीता कार्यादेश देण्यांत आलेला आहे.

मा. महापौर यांचे जाक्र/जशमनपा/मका/११/२०२६ दिनांक १८/०२/२०२६ अन्वये प्राप्त पत्रानुसार त्यांनी शहरातील २० मुख्य रोडवरील सर्व अतिक्रमण काढण्याचे आदेशीत केलेले आहे. त्या अनुषंगाने अतिक्रमण विभागात मनुष्यबळ कमी पडत असल्याने स्थायी समिती प्रशासक ठराव क्रं. २५५ दिनांक ३०/०४/२०२५ च्या मंजुरी प्रमाणे नविन १० मजुर पुरवण्यासाठी मक्तेदार रॅपिड सिक्युरिटी सर्व्हीसेस, जळगाव यांना जा.क्र/अति.नि.वि/३३/२०२६ दिनांक ३०/०३/२०२६ अन्वये नविन कायार्देश देणेत आला सध्या अतिक्रमण विभागात एकुण ३५ कामगार आहे. सदर मक्ता हा एकुण ११ महीन्यासाठी होता सदर मक्याची मुदत दिनांक ३०/०४/२६ अखेर आहे.

मक्तेदार रॅपिड सिक्युरिटी सर्व्हीसेस, जळगाव यांनी १.०००/-( एक रुपया) असा सेवा शुल्क भरलेला आहे.

मा. कामगार आयुक्त, मुंबई यांचे दि.०४/०२/२०२६ च्या परीपत्रकानुसार दि. ०१/०१/२०२६ ते दि. ३०/०६/२०२६ अ.क्र.४९ वर सफाई व मेहतर कामधंदा विशेष भत्याची रक्कम रु.७,२०८/- असुन त्यानुसार खालील प्रमाणे प्रती दिवस किमान वेतन प्रमाणे आहे

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| मुळ वेतन | + | विशेष भत्ता | + | ५% घरभाडे भत्ता | = | एकुण किमान वेतन |
| १०,००० | + | ७,२०८ | + | ८६० | = | १८,०६८/- |

वरील एकूण किमान वेतनास २६ ने भागुन येणारी रक्कम रु.६९५/-एक दिवसांचे देय राहील. एकादया आस्थापनेस/ठेकेदाराकडे ५० पेक्षा जास्त कामगार काम करीत असल्यास एकुण वेतनास (मुळ वेतन + विशेष भत्ता) यांचा ५% घरभाडे भत्ता देणे आवश्यक

रु.६९५/- प्रती कामगार प्रती दिवस

मा. कामगार आयुक्त, मुंबई यांचे दि.०४/०२/२०२६ च्या परीपत्रकानुसार कामगारांना देय असलेले किमान वेतन दर रु.६९५/- असुन या व्यतिरिक्त कामगार कायदयातील तरतुदीनुसार ३४.६१% लेव्हीची रक्कम अभिकर्त्यामार्फत कामगारांना देणे अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | भविष्य निर्वाह निधी | १२.३६% |
| २ | ई.एस.आय.सी | ३०२५% |
| ३ | बोनस | ८.३३% |
| ४ | ग्रॅज्युईटी | ४.००% |
| ५ | किरकोळ रजा | १.००% |
| ६ | गणवेश/पावसाळी साहीत्य वाटप करणे | ४.००% |
| ७ | Workmen compensation insurance व इतर खर्च | १.६७% |
| | एकुण | ३४.६१% |

| अ.क्र. | विवरण | कामगार संख्या | टक्केवारी | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | मुळ वेतन | - | - | ३८५ |
| २ | विशेष भत्ता | - | - | २७७ |
| ३ | घरभाडे भत्ता (५%) | - | - | ३३ |
| ४ | एकुण = मुळ वेतन + विशेष भत्ता + घरभाडे | १ कामगार | - | ६९५ |
| | | | | |
| १ | भविष्य निर्वाह निधी (Contribution Basis + DA) | १ कामगार | १२.३६% | ८२ |
| २ | ई.एस.आय.सी | १ कामगार | ३.२५% | २२ |
| ३ | बोनस | १ कामगार | ८.३३% | ५५ |
| ४ | ग्रॅज्युईटी | १ कामगार | ४.००% | २६ |
| ५ | किरकोळ रजा | १ कामगार | १.००% | ७ |
| ६ | गणवेश/पावसाळी साहीत्य वाटप करणे | १ कामगार | ४.००% | २६ |
| ७ | Workmen compensation insurance व इतर खर्च | १ कामगार | १.६७% | ११ |
| | | | ३४.६१% | २२९ |

| | |
|---|---|
| मुळ वेतन + विशेष भत्ता + घरभाडे भत्ता (१कामगार) ६९५ + लेव्ही रक्कम (१ कामगार) २२९ असे एकुण | ९२४ |
| सर्व्हीस चार्ज प्रति कामगार प्रति दिन | ०१ |
| निविदाधारक यांना अदा करण्यात येणारी एकुण रक्कम प्रति कामगार प्रति दिन | ९२५ |

मा.महापौर यांनी अतिक्रमण विभागाचे कामे प्रभावी होणेसाठी प्रभाग निहाय अतिक्रमण काढणेसाठी एक प्रभागासाठी १५ असे एकुण ६० मजुरांची आवश्यकता आहे. अतिक्रमण विभागाकडुन आर्थिक वर्षात १,३५,५०,०००/- इतकी बजेट तरतुद करण्यांत आलेली आहे. या बजेट मध्ये अंदाजे ३०० दिवसा साठी ४८ मजुर घेतल्यास किमान कायदा नुसार देय्यक रु.६९५ + लेव्हीची रक्कम रु. २२९ + सेवा शुल्क रु.१.०० असे रु.९२५/- असे एकुण ४८ मजुर अंदाजे ३०० दिवसांसाठी रु. १,३३,२०,०००/- इतका खर्च येणार आहे.

प्रस्तावित केलेनूसार एकुण ४८ मजुरांवर अंदाजे ३०० दिवसांकरीता रु.१,३३,२०,०००/- मात्रचे येणा-या खर्चास, सन २६-२७ करीता ४८ मजुर घेणे साठी ई निविदा प्रसिध्द करणेस व जो पावेतो ई निविदा प्रकिया पूर्ण होई पावेतो मक्तेदार रॅपिड सिक्यूरिटी ॲण्ड सर्व्हीसेस, जळगाव यांना ३५ मजुर पुरवठा करणेस मुदत वाढ देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर कामी मजुर नियुक्त करण्याआधी त्यांची पार्श्वभूमी तपासून त्यांची पडताळणी करणेबाबत मक्तेदारास सूचना देण्यात यावी व यापूढे असे प्रस्ताव दोन महिन्याआधी मान्यतेस्तव सादर करावे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १०** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- श्री.विष्णु रामदास भंगाळे**

**सही /-**
(डॉ.चंद्रशेखर शिवाजी पाटील)
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त,महानगरपालिका, जळगांव.**

दैनिक बाजार वसुली मक्तेदार नेमणे बाबत तसेच देकार रक्कम निश्चित करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगाव शहर महानगरपालिका हद्दीत भरणारा दैनिक बाजार शुल्क वसुली करता श्री. किरण शंकरराव भालोदकर, जळगाव यांची मक्तेदार म्हणून नेमणूक करण्यात आलेली होती. सदर मक्तेदार यांची मुदत सन २०२३ मध्ये संपलेली आहे, त्यावेळी महासभा ठराव क्र. १०४५ दिनांक २१/०३/२०२३ नुसार विद्यमान मक्तेदारास निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

महासभा ठराव क्र. १०४५, दिनांक २३/०३/२०२३ अन्वये मागील वसुली रकमेत १०% वाढ करून ई-निविदा प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता. त्यानुसार दिनांक १२/०५/२०२३ रोजी वार्षिक अंदाजपत्रक रक्कम रुपये १,८०,४०,८६४/- निश्चित करून ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली. तथापि, सदर निविदेस कोणताही प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.

त्यानंतर वारंवार एकूण ९ ते १० वेळा ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली होती, मात्र त्यातही प्रतिसाद मिळालेला नाही, परिणामी, दैनिक बाजार शुल्क वसुली महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून करण्याबाबत कार्यवाही विचाराधीन होती. सदर कामासाठी सुमारे १५ वसुली कर्मचाऱ्यांची आवश्यकता असून त्यांच्या वेतनावर वार्षिक अंदाजे रुपये ८१,००,०००/- अक्षरी (एक्याऐंशी लाख रुपये) इतका खर्च अपेक्षित आहे. महानगरपालिका कर्मचाऱ्यांमार्फत होणारी अपेक्षित वसुली व त्यावर होणारा खर्च तसेच महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचा विचार करता सदर प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आलेला आहे. वारंवार ई-निविदेस प्रतिसाद न मिळाल्यामुळे विद्यमान मक्तेदारास मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर निविदेस स्पर्धात्मक प्रतिसाद मिळावा या हेतूने व वसुलीचा कालावधी वाढविण्याच्या दृष्टीने ०१ वर्षाऐवजी ०३ वर्षांचा कालावधी निश्चित करून दिनांक ०४/०४/२०२५ रोजी नव्याने निविदा प्रसिद्ध करण्यात आली. तथापि, त्यालाही प्रतिसाद प्राप्त झालेला नाही. मुख्य लेखापरीक्षक यांच्या दिनांक ०५/०२/२०२५ च्या अभिप्रायानुसार निविदेच्या अटी व शर्तीबाबत पुनर्विचार करणेआवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले असून माननीय आयुक्त महोदयांनी पुनर्विचार प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

निविदेतील लिफाफा क्र. १ मधील अट क्र. १० नुसार अनुभवाचा दाखला सादर करणे ही अट बंधनकारक ठेवण्यात आलेली आहे. सदर अट रद्द/शिथिल करण्याबाबत विचार होणे आवश्यक आहे. सन २०२२ मध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार शहरात एकूण ४२४७ हॉकर नोंदविण्यात आले होते. पुढील दोन वर्षांत अंदाजे ७५३ वाढ गृहीत धरल्यास सध्याची संख्या सुमारे ५००० इतकी होते. प्रति हॉकर रुपये २०/- दैनिक वसुलीप्रमाणे धरल्यास दररोज अंदाजे रुपये १,००,०००/- व वार्षिक सुमारे रुपये ३,६५,००,०००/- अशी निविदेसाठी देकार रक्कम निश्चित करणेबाबत प्रशासनाने प्रस्तावित केले असून

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार निविदेतील लिफाफा क्र. १ मधील अट क्र. १० नुसार अनुभवाचा दाखला सादर करणे ही अट बंधनकारक ठेवण्यात आलेली आहे. सदर अट कायम ठेवणेस, दैनिक बाजार शुल्क वसुली कामी वसुलीचा कालावधी ०१ वर्षाऐवजी ०३ वर्ष निश्चित करणेस तसेच आजच्या हिशोबाने बाजार शुल्क वाढविणे बाबत विचार करुन देकार रक्कम पडताळणीअंती व पूर्ण तपासणी करुन अंतिम देकार रक्कम निश्चित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १०** **प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा**
**अनुमोदक :- श्री.विष्णु रामदास भंगाळे**

**सही /-**
(डॉ.चंद्रशेखर शिवाजी पाटील)
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त,महानगरपालिका, जळगांव.**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे जमा व खर्चाचे विवरणपत्रास (Annual Report) मंजुरी देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, लेखा व वित्त विभागाकडून तयार करण्यात आलेला वार्षिक हिशोब लेखाशीर्ष निहाय जमा व खर्चाचे विवरणपत्र स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी ठेवणे कामी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील विवरणपत्रानुसार वार्षिक हिशोबातील(Annual Report) तपशील खालीलप्रमाणे आहे.

सदर वार्षिक लेखा विवरण पत्रात नमूद केले प्रमाणे आरंभिची शिल्लक रु. २६८,७०,६३,९२५/- व भाग अ व क ची एकुण जमा रक्कम रु. ४२३,०७,४४,९९९/-असून झालेला खर्च रु. ४६१,९६,२४,४४४/- इतका आहे. वर्षाअखेर रु. २२९,८१.८४,४८०/-मात्र इतकी शिल्लक आहे. तसेच भाग ब परीवहन विभागाचे जमा व खर्चाचे विवरण स्वतंत्र दाखविण्यात आलेले असून त्यासह एकूण रक्कम रु.६९६,८०,३४,५२०/- मात्र दर्शविण्यात आलेली आहे. सदर जमेच्या आरंभिच्या शिल्लक रक्कमेत जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचे शेअर्स रु.२,८१,७८,१००/- मात्रचा समावेश आहे.

करीता लेखा व वित्त विभागाकडून सन २०२५-२६ चा तयार करण्यात आलेला वार्षिक हिशोब (Annual Report) उपरोक्त वित्तीय आकडेवारी आणि अधिनियमातील तरतुदी पाहता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९४ (१) अन्वये हा प्रस्ताव पुढील मंजुरीसाठी स्थायी समिती समोर सादर करण्यात येत आहे.

विभागाने प्रस्तावित केलेनुसार सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात जमा व खर्चाचे लेख्यांची तपासणी केली असता त्यातील जमा व खर्चाचा ताळमेळ बरोबर आहे. करीता सदर वार्षिक तपासणी अहवाल अधिनियमातील कलम ९४ (१) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १०　　　　प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा**
**अनुमोदक :- श्री.विष्णु रामदास भंगाळे**

**सही /-**
(**डॉ.चंद्रशेखर शिवाजी पाटील**)
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त,महानगरपालिका, जळगांव.**

जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत जळगांव शहर मनपा अंतर्गत इमारत व पायाभुत सुविधा प्रकल्पासाठी नियोजन, डिझाईन देखरेख गुणवत्ता हमी कामांसाठी वास्तुविशारद व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची निवड करणे कामी वास्तुविशारद यांचे वाटाघाटी अंदाजित किमतीवर १.९९०% फी असे दरास मान्यता देणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करण्यात येतो की, मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत जळगांव शहर मनपा अंतर्गत इमारत व पायाभुत सुविधा प्रकल्पासाठी नियोजन, डिझाईन देखरेख गुणवत्ता हमी कामांसाठी वास्तुविशारद व प्रकल्प व्यवस्थान सल्लागार यांची निवड करणे कामास आयुक्त यांचे दि.३१/१०/२०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार ई निविदा प्रसिध्द करण्यास आयुक्त, मनपा यांचे दि ३१/१०/२०२५ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं. ६३६ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/८९६ दि.१३/११/२०२५ चे पत्रान्वये दै. लोकमत या वर्तमान पत्रात दि.१४/११/२०२५ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणका व्दारे निविदा भरणेकरीता दि.१३/११/२०२५ ते दि. २०/११/२०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. सदर निविदेस प्रतिसाद न मिळल्याने उक्त ई निविदेस ०७ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली होती त्यानुसर मुदतीत संगणकाव्दारे https://mahatenders.in वर दिलेल्या मुदतीत १२ ई निविदा सदर संकेस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. त्यानुसार आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांचे फोल्डर क्रं. १ उघडले असता १२ वास्तुविशारद यांचे उक्त कामाचे प्राप्त झालेले ई-निविदा कागदपत्रांचे संबंधीत युनिट अभियंता व सार्व. बांधकाम विभागाचे उपलेखापाल यांनी छाननी केली असता वास्तुविशारद आर्की. चेतन सोनार, आर्की. नितीन पारगावकर यांच्या कडेस पि.एम.सी/पि.डी.एम.सी कागदपत्र नसल्याने व विजय सुर्यकांत यांच्या कडेस निविदा अटी शर्तीनुसार २० वर्षापेक्षा जास्त कामाचा अनुभवाचा दाखला सादर केलेला नाही त्यामुळे संबंधित निविदाकार यांना अपात्र ठरविण्यात आले आहे व खाली नमुद वास्तुविशारद यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने निविदा समितीने दिलेला निर्णया नुसार त्यांचे ई निविदा फोल्डर नं. २ दि. २१/०४/२०२६ रोजी ओपन करुन उक्त मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्त्याची संगणकावर प्रिन्ट प्रत काढुन घेण्यात आली असुन त्या नुसार ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | वास्तुविशारद यांचे नांव | Sibossion of DPR | After Admonostrative Approval | After Work Awarded | After Completion of २५% Work | After Completion of ५०% Work | After Completion of ७५% Work | After Completion of १०% Work | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० |
| ०१ | आर्की.राजेंद्र गटानी & असोसिएट | ०.५५० | ०.२०० | ०.२५० | ०.२०० | ०.४०० | ०.३०० | ०.१०० | २.००% |
| ०२ | निकम आर्कीटेक्ट & इंजिनिअरर्स प्रा.लि. | ०.२५० | ०.२४० | ०.१६० | ०.२७० | ०.२७० | ०.४०० | ०.४०० | १.९९०% |
| ०३ | आर्की.संदिप गुरव & असोसिएट | ३.०० | ३.०० | ३.०० | ३.०० | ३.०० | ३.०० | ३.०० | २१.००% |
| ०४ | शुन्य कंन्स्लटन्ट | १.०० | ०.४०० | ०.३०० | ०.२५० | ०.३५० | ०.४०० | ०.२५० | २.९५०% |
| ०५ | स्कायलाईन आर्कीटेक्ट | ०.५०० | ०.२५० | ०.२५० | ०.५०० | ०.५०० | ०.२५० | ०.२५० | २.५००% |
| ०६ | सुशिल देशमुख & असोसिएट | ०.४०० | ०.३०० | ०.४०० | ०.४०० | ०.४०० | ०.४०० | ०.१०० | २.४००% |
| ०७ | द आर्कीटेक्ट | ०.५०० | ०.५०० | ०.५०० | ०.५०० | ०.५०० | ०.५०० | ०.५०० | ३.५००% |
| ०८ | यु बी आर्कीटेक्ट | ३०.०० | १५.०० | १५.०० | १५.०० | १०.०० | १०.०० | ५.०० | १००% |
| ०९ | यश इनव्हिटीव्ह सोलुशन एल एल पी | ०.३३० | ०.१७० | ०.१६० | ०.२७० | ०.२७० | ०.४०० | ०.४०० | २.००% |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता नमुद वास्तुविशारद निकम आर्कीटेक्ट & इंजिनिअरर्स प्रा.लि. यांनी प्रकल्पाच्या होणाऱ्या किमतीच्या १.९९% फी असे दर सादर केलेले केलेले आहे.

परंतु महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१८/प्र.क्रं.५४/नवि-१६ मंत्रालय मुंबई दि. ०४ जुन २०१८ अन्वये शासनाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्काचे प्रदानाचे दर ठरवुन दिले आहे. शासन निर्णयाच्या निर्देशनानुसार प्रकल्प किमतीच्या २% प्रकल्प व्यवस्थापन शुल्क असे दर मंजुर आहे. परंतु वर नमुद प्रमाणे तक्ता पहाता सर्वात कमी आलेले दर म्हणजेच प्रकल्प किमतीच्या १.९९% मात्रच्या दरात इतर वास्तुविशारद काम करण्यास तयार असतील तर त्यांना दरा बाबब वाटाघाटीसाठी बोलवून दर निश्चित करणे योग्य राहिल तरी वर नमूद वास्तुविशारद यांना घाटाघाटीसाठी बोलविण्यास शहर अभियंता यांनी मान्यता दिल्यानुसार वास्तु विशारद यांना पत्र क्र. साबा/७० दि.२४/०४/२०२६ अन्वये कळविण्यात आले असता वाटाघाटी अंती खालील प्रमाणे दर दिलेले आहे.

| अ.क्रं. | वास्तुविशारद यांचे नांव | निविदेत आलेले दर | वाटाघाटी अंती प्राप्त दर |
|---|---|---|---|
| ०१ | आर्की. राजेंद्र गटानी &असोसिएट | २.००% | १.९९०% |
| ०२ | निकम आर्कीटेक्ट & इंजिनिअरर्स प्रा.लि. | १.९९०% | १.९९०% |
| ०३ | आर्की. संदिप असोसिएट & असोसिएट | २१.००% | १.९९०% |
| ०४ | शुन्य कंन्स्लटन्ट | २.९५०% | १.९९०% |
| ०५ | स्कायलाईन आर्कीटेक्ट | २.५००% | १.९९०% |
| ०६ | सुशिल देशमुख & असोसिएट | २.४००% | १.९९०% |
| ०७ | द आर्कीटेक्ट | ३.५००% | १.९९०% |
| ०८ | यु बी आर्कीटेक्ट | १००% | १.९९०% |
| ०९ | यश इनव्हिटीव्ह सोलुशन एल एल पी | २.००% | १.९९०% |

वरील तक्त्यात नमुद प्रमाणे पाहता ०१ ते ०९ वास्तुविशारद यांनी वाटाघाटी अंती प्रकल्प अहवाल तयार करणे व कामांवर तांत्रीक व्यवस्थापन ठेवण्याकरीता एकुण प्रकल्पाच्या होणाऱ्या अंदाजित किमतीवर १.९९०% फी असे दर सादर केलेले आहे. शासनाने निर्णय क्रमांक संकीर्ण २०१८/प्र.क्र.५४/नवि-१६ / मंत्रालय मुंबई दि.०४/०६/२०१८ नुसार निर्धारीत केल्याप्रमाणे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियान अंतर्गत कामांचे प्रकल्प अहवाल तयार करणे त्यास शासन स्तरावर घ्याव्या लागणाऱ्या सर्व मान्यतांसाठी पाठपुरावा करणे, प्रस्तावातील तृटीच्या सर्व स्तरावर पुर्तता करणे प्रकल्पास मान्यता घेवुन सदरच्या कामांचे व्यवस्थापन करण्यासाठी ३% सल्लागार फी निश्चित करण्यात आलेली आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्तरावर करावयाच्या कामांसाठी २% शुल्क निश्चित करण्यात आलेले आहे. प्रस्तावीत प्राप्त झालेले दर शासकीय स्तरावर विविध टप्पे गाठुन कामांना घ्यावयाच्या प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही करणे प्रकल्पाचे व्यवस्थापन करणे इत्यादी साठी २.५०% इतके दर प्राप्त झालेले आहे. तसेच स्थानीक स्वराज्य संस्था स्तरावर करावयाच्या कामांसाठी २% इतके व्यवस्थापन शुल्क आकारण्याचे दर प्राप्त झालेले आहे. सदरचे दर दि.०४/०६/२०१८ नुसार शासन निर्णयात निर्धारीत केल्याप्रमाणे दरा पेक्षा कमी दर असल्याने सदरचे दर स्विकारण्यास तसेच वाटाघाटी अंती अंदाजित किमतीवर १.९९०% फी असे दराने काम करण्यास तयार असलेल्या उपरोक्त वास्तुविशारद / सल्लागारांना महानगरपालिकेच्या सुचीवर सल्लागार, वास्तु शास्त्रज्ञ म्हणून नियुक्त करण्यास मनपा निविदा समितीने सर्वानुमते शिफारस केलेलेनूसार सदर दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नूसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच सभेत मा.सभापती यांनी सूचित केलेनूसार शासनाचे विविध योजनेत इतर PMC आपल्याला सहकार्य करीत असतील तर त्यांना महानगरपालिकेच्या पॅनलवर आयुक्त व स्थायी समितीचे मान्यतेने घेणेसही मान्यता देण्यात येत आहे. तसेच श्री.नितीन पारगांवकर यांना सुध्दा महानगरपालिकेच्या वास्तुविशारद / सल्लागार पॅनलवर घेणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १०    प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- श्री.विष्णु रामदास भंगाळे**

**सही /-**
**(डॉ.चंद्रशेखर शिवाजी पाटील)**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त,महानगरपालिका, जळगांव.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे १९४९ चे कलम २८९ अन्वये जळगांव शहर महानगरपालिका अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाकडून दि.०१/०२/२०२६ ते दि.२८/०२/२०२६ पावेतोच्या आगीचा अहवालाची माहिती घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे १९४९ चे कलम २८९ अन्वये जळगांव शहर महानगरपालिका अग्निशमन व आपत्कालीन सेवा विभागाकडून दि.०१/०२/२०२६ ते दि.२८/०२/२०२६ पावेतोच्या आगीचा अहवालाची माहिती घेतली.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १०** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- श्री.विष्णु रामदास भंगाळे**

**सही /-**
**(डॉ.चंद्रशेखर शिवाजी पाटील)**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त,महानगरपालिका, जळगांव.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

असा ठराव करणेंत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१) प्रशासकीय आदेश क्र.पापुवि/७९ दि.१२/०५/२०२६ अन्वये शहरातील अत्यावश्यक सेवांचे ठिकानांवरील वीजपंप दुरुस्त करणे कामी मक्तेदार मे.न्यु.आर.के.इलेक्ट्रिकल,जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच चे सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.६०,४३६/- मात्र खर्चाची संविदा.

२) प्रशासकीय आदेश क्र.पापुवि/८० दि.१४/०५/२०२६ अन्वये उमाळा जलशुध्दीकरण केंद्र येथील स्काडा यंत्रणा, सुरक्षा रक्षक केबीन व परीसरात विदयुत उपकरणे व अनुषंगिक साहीत्य पुरविणे व बसविणे कामी मक्तेदार मे.न्यु.आर.के.इलेक्ट्रिकल,जळगांव यांचे अंदाजित रक्कमेतच चे सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.४,९८,३४९/- मात्र खर्चाची संविदा.

३) प्रशासकीय आदेश क्र.पापुवि/८१ दि.१९/०५/२०२६ अन्वये शासन निर्णय क्र.एफएफसी २०२०/प्र.क्र.५६/नवि-४ मंत्रालय मुंबई दिनांक २८ ऑक्टोबर २०२० अन्वये II ब) मुलभूत अनुदान/ अबंधनकारक अनुदान व्दारे वाघुर रॉ वॉटर पंपिंग स्टेशनचे माहे एप्रिल २०२६ चे चालू देयक रक्कम रु.८२,५८,९६०/- मात्रचे देयक १५ वित्त आयोग निधीतुन महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांना अदा करणे कामी रक्कम रु.८२,५८,९६०/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १०　　　　प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा**

**अनुमोदक :- श्री.विष्णु रामदास भंगाळे**

**सही /-**
**(डॉ.चंद्रशेखर शिवाजी पाटील)**
**सभापती**
**स्थायी समिती**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**प्रत कार्यवाहीस्तव**
**मा.आयुक्त,महानगरपालिका, जळगांव.**